# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

शिवराज्यभिषेक दिनानिमित्त शिवस्वराज्य दिन सोहळा मंगळवार दिनांक ०६ जून, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता विद्यापीठाच्या प्रांगणात संपन्न होणार आहे. सदर सोहळयामध्ये मा. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांचे शुभहस्ते व मा. प्र–कुलगुरु प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांचे प्रमुख उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या लहान पुतळयास पुष्पहार अर्पण करणे व मोठया पुतळयास फुले वाहणे हा समारंभ आयोजित करणेत आलेला आहे. तरी विद्यापीठातील सर्व प्रशासकीय अधिकारी, सर्व विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व अधिविभागातील विद्यार्थी/विद्यार्थीनीं यांनी या समारंभास उपस्थित रहावे. ही विनंती.

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/1390
दिनांक : ३०/०५/२०२३

संचालक
विद्यार्थी विकास

प्रति,

१. सर्व पदव्युत्तर अधिविभाग प्रमुखांना आपल्या अधिविभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी/विद्यार्थीनी यांना वरील समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्यावी.
२. सर्व प्रशासकीय विभागप्रमुखांनी आपल्या विभागातील सर्व सेवकांना समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्यावी.
३. मा. अधिविभागप्रमुख, संगीत व नाटयशास्त्र अधिविभाग यांनी संचालक, विद्यार्थी विकास यांच्याशी संपर्क साधावा व सदरच्या कार्यक्रमाच्यावेळी राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीत गायनाची व्यवस्था करावी.
४. वाहन विभागप्रमुख यांनी मा. अधिविभागप्रमुख, संगीत व नाटयशास्त्र अधिविभाग यांच्या सूचनेप्रमाणे गायक/कलाकार व वाद्ये आणण्यासाठी वाहनाची सोय करावी.
५. विद्युत अभियंता यांनी वरील दिवशी सदर कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपकाची व्यवस्था करावी व रांगोळीसाठी आदल्या दिवशी लाईटची व्यवस्था करावी.
६. आभियांत्रिकी विभागाने वरील दिवशी कार्यक्रमाच्या ठिकाणी स्वच्छता ठेवण्यासंबंधी संबंधीत कर्मचारी यांना सूचना द्यावी व छत्रपती शिवाजी महाराजांच्या मोठया पुतळयाची देखभाल पहावी.
७. उद्यान विभागप्रमुखांनी कार्यक्रमाचे परिसरातील बागेची ठाकठिकता पहावी. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या मोठया पुतळयास व लहान पुतळयास असे दोन पुष्पहार आणावेत.
८. आभियांत्रिकी विभाग यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मोठया पुतळयास पुष्पहार अर्पण करण्याची व्यवस्था करावी व लहान पुष्पहार मा. कुलगुरू यांचे शुभहस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या लहान पुतळयास अर्पण केला जाईल. याची नोंद घ्यावी.
९. नोटीस बोर्डवर लावणेसाठी–
   १) मुलांचे वसतिगृह क्र. १, २ व ३    २) मुलींचे वसतिगृह क्र. १, २ व ३
   ३) डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन    ४) बॅरीस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय.
   ५) डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थीनी भवन    ६) तंत्रज्ञान अधिविभाग मुलांचे व मुलींचे वसतिगृह
१०. श्री. डी. आर. चौगुले, जमादार व श्री. व्ही. डी. चांदणे यांनी आस्थापना विभागाच्या यापूर्वीच्या आदेशानुसार चार शिपाई या विभागाच्या मदतीस देण्याचे आहेत. त्याची पूर्व सूचना दिनांक. ०५ जून, २०२३ रोजी सर्व संबधितांना त्यांनी द्यावी.

––०००––

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## शिवस्वराज्य दिन मंगळवार, दि.०६ जून, २०२३
## शिवस्वराज्य दिन सोहळा कार्यक्रम पत्रिका
## वेळ सकाळी ११.०० वाजता

मा. कुलगुरूंचे आगमन व :

मा. कुलगुरूंचे शुभहस्ते

छ. शिवाजी महाराजांच्या लहान पुतळयास पुष्पहार अर्पण त्यानंतर

छ. शिवाजी महाराज यांच्या मोठया पुतळयासमोर पुष्पहार व फुले वाहून अभिवादन

(मा. कुलगुरू मोठया पुतळयासमोर थांबतील.)

| | |
|---|---|
| राष्ट्रगीत होईल. | : भारत माता की जय !<br>(तीन वेळा पुकार) |
| महाराष्ट्र गीत होईल | |
| विद्यापीठ गीत | : छ. शिवाजी महाराजकी जय !<br>(तीन वेळा पुकार) |

——०००——